माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.८६७९/२१/अ.क्र.५८६०/२४/०१**

**श्रीमती प्रमिला ठाकूर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी ग्राहक सेवा जी/उत्तर विभाग**

ग्राहक सेवा, जी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम, बृहन्मुंबई महानगरपालिका, परिवहन
अभियांत्रिकी इमारत, टिळक मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा हं अधिक्षक जी/उत्तर**

ग्राहक सेवा, जी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम, बृहन्मुंबई महानगरपालिका, परिवहन
अभियांत्रिकी इमारत, टिळक मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ११.११.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०३.२०२१ | ३१.०३.२०२१ | २१.०४.२०२१ | ३०.०६.२०२१ |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. ३१.०३.२०२१ रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. ३०.०६.२०२१ रोजीचे आदेश संलग्न करुन दि. ३०.०७.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपीलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दिनांक ०३.०३.२०२१ नुसार SRA Scheme was executed by M/s. Omkar Enterprises for Nand Gopal CHSL at FP No.551A, Garage Gully, Kaka Sahib Gadgil Cross Lane, Dadar West Mumbai 400028 A Sub Station was constructed for that purpose on FP 551A. याबाबत खालीलप्रमाणे मुद्येनिहाय माहिती विचारलेली आहे.

1. Kindly furnish in details the following information.
2. Copies of documents submitted for the construction of said Sub Station.
3. Copy of the Sanction Letter.
4. Copy of the Plan showing demarcation between FP 551A & FP 559
5. Copy of the location Plan of the substation

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ३१.०३.२०२१ नुसार अपिलार्थी यांना कळविले आहे की, अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.०४.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.०६.२०२१ रोजी "संबंधीत विभागाकडून आपण निरीक्षण केलेली व आपण मागितलेली कागदपत्रे (जर असल्यास) उपलब्ध

झाल्यावर आपणांस देण्यात येतील. यासंबंधी आपण दिलेल्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्यात येईल" असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. ३०.०६.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ग्राहक सेवा जी/उत्तर विभाग अनुपस्थित आहे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा हं अधिक्षक जी/उत्तर, श्री. रत्नाकर कांबळे उपस्थित आहे.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा हं अधिक्षक जी/उत्तर, श्री. रत्नाकर कांबळे यांनी असे विशद केले की, अभिलेखावरुन असे निदर्शनास येते की, प्रथम अपील आदेशानंतर अपीलार्थी यांना संपूर्ण नस्तीचे निरिक्षण करुन माहिती देण्यात आली नाही. तरी अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा हं अधिक्षक जी/उत्तर, श्री. रत्नाकर कांबळे यांनी दि. १९.११.२०२४ रोजी अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संलग्न करुन आयोगास निवेदन सादर केले.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ग्राहक सेवा जी/उत्तर विभाग यांनी अपीलार्थी यांना दि. १९.११.२०२४ रोजी आयोगास सादर करण्यात आलेले निवेदनाची प्रत सहपत्रा सह आदेश प्राप्तीचे १५ दिवसांच्या आत नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

प्रदीप व्यास 19-11-2024

**मुंबई**
**दिनांक :१९.११.२०२४**

**( डॉ.प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**